<u>प्रेसनोट</u> दि. १२/०६/२०२३

पुणे महानगरपालिकेतील चतु:श्रृंगी पाणीपुरवठा विभागामधील मीटर रीडरवर
लाच मागणी व लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | **पुणे घटक** |
| गुन्हा नोंद क्रमांक | डेक्कन पोलीस **स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. ११४/२०२३** |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम **कलम ७,** [redacted]. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ३१ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. उमेश राजाराम कवठेकर, **वय ५४ वर्ष, मीटर रीडर** (वर्ग-३), चतु:श्रृंगी पाणीपुरवठा विभाग, पुणे महानगरपालिका, **पुणे.** |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २५,०००/- रुपये (पंचवीस हजार रुपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | २५,०००/- रुपये |
| पडताळणी दिनांक | ११/०६/२०२३ |
| सापळा दिनांक | ११/०६/२०२३ |

ठिकाण :- चतु:श्रृंगी पाणीपुरवठा विभाग, कर्वे रोड, पुणे कार्यालयाचे आवारात.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे परवानाधारक प्लंबर असून, **लायझनींगचे काम** करतात. त्या **संदर्भाने** पुणे महानगरपालिकाचे पाणीपुरवठा विभागकडून **ना-हरकत पत्र मिळवण्यासाठी अर्जदार बिल्डर यांनी सिटी सर्वे नंबर** २२८१ ते २२८८, शिवाजीनगर, भांबुर्डा, पुणे येथील **मिळकतीचे पाणीपुरवठा विभागाचे** ना-हरकत पत्र **मिळण्यासाठी** तक्रारदार यांचे प्लंबिंग लायसन्सची प्रत जोडून अर्ज केला होता. पाणी पुरवठा **विभागाचे** ना-हरकत पत्र **मिळण्यासाठी** तक्रारदार हे पाठपुरावा करत होते. सदरचे ना-हरकत पत्र **घेणेसाठी कर्वे रोड येथील पाणीपुरवठा विभागात** गेले असता, मीटर रीडर लोकसेवक उमेश कवठेकर यानी **सदरचे ना-हरकत पत्र देणेसाठी रक्कम रुपये** २५,०००/- (पंचवीस हजार रुपये) **लाचेची** मागणी केल्याची **तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.**

तक्रारदारांनी **दिलेल्या तक्रारीची** पडताळणी **केली असता, लोकसेवक उमेश कवठेकर यानी सदरचे ना-हरकत** पत्र देणेसाठी **तक्रारदाराकडे त्यांचे दोन वरिष्ठ अधिकारी यांचेसाठी प्रत्येकी १०,०००/ रुपये व स्वत:साठी** ५,०००/- रुपये अशी एकूण २५,०००/- रुपयांची लाच मागणी **करुन, ती लाच रक्कम चतु:श्रृंगी पाणीपुरवठा विभाग** कार्यालय, कर्वेरोड, पुणे आवारात पंचासमक्ष **स्विकारल्यावर लोकसेवक उमेश कवठेकर याना रंगेहाथ पकडण्यात** आले असून, डेक्कन पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे वरील प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात **आला असून, त्यामध्ये** त्याना अटक करण्यात आली आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक संदिप व-हाडे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक **श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि.** पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्रीमती. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली **पुणे लाचलुचपत प्रतिबंधक** विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर संपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. **पुणे यांनी केले** आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अँप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-अँप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन अँप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(नितीन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.